MHAH060023972022

**न्यायनिर्णय**

**(जाहीर दिनांक ११.०२.२०२३)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १५२५/२०२२**

आरोपी हजर. आरोपीस भारतीय दंड विधान कल २८३ व मोटर वाहन कायदा कलम १२२/१७७ या कलमाचा तपशील वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी तो स्वखुशीने कबूल केला. आरोपीने गुन्हा कबूल केलेला असल्याने सरकारी वकिलांचा व आरोपीच्या शिक्षेच्या मुद्यावर युक्तीवाद ऐकण्यात आला. आरोपीने ते एकमेव कुटूंबातील कर्ते व कमविते इसम असल्याने संपुर्ण कुटूंब त्यांचेवर अवलंबून आहे, ते मजुरीचे काम करतात, त्यांना तुरूंगात पाठविल्यास संपूण कुटूंब निराधार होईल, ते पोट भरण्यासाठी मजुरीवर संपूर्णपणे विसंबून आहेत, तरी कमीत कमी दंड रक्कमेची शिक्षा व्हावी अशी विनंती केली. याउलट सरकारी वकिलांनी जास्तीत जास्त दंड रक्कमेची तसेच कैदीची शिक्षा होण्यासाठी विनंती केली आहे.

२. आरोपीवर दुसरा कुठलाही गुन्हा असल्याचा अभिलेख समोर आलेला नाही. त्यामुळे या न्यायालयाचे मते गुन्हयाच्या स्वरूपाचा विचार करता आरोपीस खालील आदेशात नमूद शिक्षा दिलेस न्यायाचा अंतिम हेतू साध्य करण्यासाठी ती शिक्षा पुरेशी होईल. करिता खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी रोहित कैलास ओमदं यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम २८३ व मोटर वाहन कायदा कलम १२२/ १७७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाकरिता सिध्ददोषी ठरविण्यात येते.

२. आरोपीला भारतीय दंड विधान कलम २८३ व मोटर वाहन कायदा कलम १२२-१७७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाकरिता या न्यायालयाचे आजचे दिवसाचे कामकाज संपेपावेतो (कोर्ट उठेपर्यंत) शिक्षा ठोठावणेत येते, तसेच रूपये ३००/- (अक्षरी रूपये तीनशे मात्र) इतका दंड ठोठावण्यात येतो. दंड न भरल्यास सदर आरोपीने दोन दिवस असा साधा कारावास भोगावा.

३. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.

Kharade 11.2.23

दिनांक – ११.०२.२०२३

ठिकाण – श्रीरामूपर.

(एन.के.खराडे )

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

न्यायालय क्र. २, श्रीरामपूर.

फाईन / पेनल्टी / क्रि / सि

सी.र.न 393/2023 रू 300/-

(अक्षरी तीनशे रू मात्र)

जमा केले दि 11/02/2023

Asstt. Supdt.

Shrirampur

# आरोपीचे प्रतिकथन

आरोपीचे नाव – रोहित कैलास जोगदंड

प्रश्न क्र.१ – तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकाला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हाला तुमच्या विरुध्द असलेला गुन्हा मराठीमध्ये समजावून सांगण्यात आला का व तो तुम्हाला कळला आहे का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय.

आरोपीची सही

R.K. Jogdnd

दिनांक : ११.०२.२०२३

ठिकाणी : श्रीरामपूर.

Kharade
11.2.23

**(एन.के.खराडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.